Impact Factor 3.20

ISSN : 2278-9308

Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce, Education, Law and Language

Monthly Peer Reviewed International Research Journal

Special Issue March-2017



- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

Dipak Damodhare
Virad

Impact Factor Value : 3.20

ISSN- 2278-9308

Sanshodhan Samiksha

Humanities,Social Sciences,Commerce, Education, and language& Law Monthly

Peer Reviewed International Research Journal

Special Issue March 2017

Chief Editor
Prof.Virag S.Gawande

Editor
Dr. Yogesh D. Ugale
Head, Deptt. of Political Science

Co-Editor

Prof. Ajay J.Solanke (Head Deptt. of Geography)
Dr. Gajanan S.Futane (Head Deptt. of Philosophy)
Dr. Rahul V.Dakhane (Head Deptt. of History)
Dr. Ulhas N.Rathod (Head Deptt. Of Sociology)
Dr. Usha N.Rakhunde (Deptt. of Home-Economics)

Shivramji Moghe Arts,Commerce &Science College, Kelapur (Pandharkawda) Dist.Yavatmal. (M.S.)

Published By
Aadhar Publication – Amravati
(M.S.) India 444604

106	प्रा. अविनाश फाळके	प्रसार माध्यमांची लोकशाहीतील भूमिका	388
107	प्रा. डॉ. सौ. अरुणा प्र. पाटील	मुलींचा घटता जन्मदर आणि शासनाच्या योजना २०११	392
108	प्रा. अमिता चव्हाण	बुलढाणा जिल्हयातील जगप्रसिध्द लोणार सरोसराची वाढली पाण्याची पातळी एक समस्या	394
109	डॉ. प्रभाकर रामलिंग किर्तनकार	संत तुकाराम के दर्शन में सामाजिकता	397
110	प्रा. सरिता देशमुख	मागासवर्गीय मुलांवर कुपोषणाचा होणारा परिणाम व उपाय	400
111	डॉ. संदिप एम. राऊत	महर्षी वि. रा. शिंदे यांचे सामाजिक कार्य	404
112	प्रा.नरेश कृ.महाजन	'चटसम्राट' मधील सामाजिक तत्वज्ञान : आकलन आणि आस्वाद	407
113	प्रा.कमलदास राऊरेड	शेतकरी आत्महत्या: समस्या, कारणे आणि उपाययोजना	410
114	प्रा.डॉ. ज्योती राखुंडे / डॉ. सुधीर आस्टुनकर	डॉ. ना. सु. हर्डीकर यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान	417
115	प्रा.कल्पना एस.गोडघाटे	महिला सक्षमीकरण	420
116	प्रा.दिशाखा जगन्नाथराव डेरे	"शेतक-यांच्या आत्महत्या कारणे व उपाय"	424
117	डॉ. सुनील आखरे	भारतातील सौरशक्तीचा विकास	428
118	डॉ. वेदप्रकाश डोणगावकर	आदिवासींची ईश्वर धारणा आणि तत्त्वज्ञानातली ईश्वर संकल्पना	432
119	प्रा. डॉ. आशिष काळे	बालकामगाराच्या मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी संविधानात्मकतरतुदीचे अध्ययन	435
120	प्रा. डॉ. उमेश आर.धुमाळे	मानवी हक्क : सद्यस्थिती व आव्हाने आणि उपाययोजना	440
121	डॉ.रजनी कचंलवार	कुपोषण	442
122	राजेश पां. मेश्राम	"ग्रामिण क्षेत्रात जलप्रदुषण एक समस्या"	444
123	प्रा. ज्योती आर. खोब्रागडे	मानवी अधिकार	446
124	डॉ.बबन एस.शेलकर	मानवाधिकार आणि अनुसुचित जमाती	448
125	प्रा. सौ. संगमित्रा दि. कोलारकर (मानवटकर)	किशोरवयीन बालकों के स्वास्थ्य पर विज्ञान का प्रभाव–एक अध्ययन	450
126	प्रा. वंदना गोवर्धन	आपला आहार, जाहीरातीच्या आहारी	453

ISSN - 2278-9308

आदिवासींची ईश्वर धारणा आणि तत्त्वज्ञानातली ईश्वर संकल्पना

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.

मानव हा समाजशील प्राणी आहे आणि समाज हा विहभिन्न मानवी समुदायांनी बनला आहे. प्रामुख्याने समाजामध्ये शहरी समुदाय, ग्रामीण समुदाय आणि आदिवासी समुदाय हे प्रमुख समुदाय आहेत. या पैकी डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि आधुनिक संस्कृती तसेच जीवनपद्धती पासून अलिप्त असणाऱ्या लोकांचा समावेश प्रामुख्याने आदिवासी समुदायामध्ये केला जातो. भारतीय संविधानात आदिवासीनां 'अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे.[१] आदिवासी वा अनुसूचित जमातीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्या सांगण्यात आल्या आहेत. त्यावरुन आदिवासी समुदाय हा समान जीवन पद्धतीने जगणारा समुदाय आहे. हा समुदाय प्रामुख्याने आपली भाषा, व्यवहार, विवाह इत्यादीमध्ये समानतेला महत्व देतो. एकाच भूप्रदेशात एकत्रित वा समुहाने कैटुंबिक जीवन जगण्यावर या समुदायाचा भर असतो. या समुदायाची एक स्वतंत्र संस्कृती आणि संघटन पद्धती असते. यांच्या संस्कृतीनूसार अंतर्विवाह ही या समुदायाची वैशिष्टयपूर्ण बाब आहे. या समुदायात शिक्षण, तंत्रज्ञान, प्रगत अर्थव्यवस्थाचा अभाव आहे. परंतु समुदायांतर्गत शांतता राखण्यासाठी, बाह्य समुदायापासून संरक्षण करण्यासाठी आणि न्याय निवाडयासाठी या समुदायामध्ये राजकीय स्वरुपाची संघटनात्मक बांधणी केली जाते. जगाच्या पातळीवर अनेक आदिवासी समुदाय आहेत. जवळजवळ हे सर्व समुदाय आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती, पशुपालन, शिकार इत्यादीला महत्व देतात.

सामान्यतः मानवी समुदाय हे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक या क्षेत्रांमध्ये आपले कार्य करित असतात. या पैकी धार्मिक क्षेत्राला अनुसरुन प्रत्येक समुदाय ईश्वर, दैवी शक्ती, भक्ती, कर्मकांड इत्यादीला महत्व देतो, असा आपला समज आहे. पण वास्तविक पहाता ईश्वर, दैवी शक्ती, भक्ती, कर्मकांड इत्यादीतून धर्म संकल्पना उदयाला येते. शहरी समुदायाच्या तूलनेत आदिवासी समुदाय या ठिकाणच्या या सर्व विषयांशिवाय जादु–टोना या प्रकाराला सुद्धा महत्व देतो. आदिवासी समुदाय हा डोंगर दऱ्यात, जंगलात रहाणारा आहे. म्हणून शहरी समुदायाच्या तुलनेत आदिवासी समुदायाचा निसर्गाशी थेट संबंध आहे. हा समुदाय आपल्या उदरनिर्वाहासाठी आणि जीवन रक्षणासाठी निसर्गावरच आवलंबून राहतो. ऊन, पाऊस, वादळ, पूर, गारपीठ, भूकंप इत्यादी नैसर्गिक आपत्तींनी हा समुदाय अधिक प्रभावित झालेला असतो. प्रारंभिक अवस्थेमध्ये अशा या आपत्तींपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी हा समुदाय बऱ्याच प्रमाणात अपयशी ठरला. परिणामी निसर्गशक्तीला नियंत्रणात ठेवणारी कुठलीतरी एक दैवीशक्ती असली पाहीजे असे मानून हा समुदाय ईश्वराची कल्पना करु लागला. ईश्वर हा मानवाचा संरक्षक असतो. तो मानवाच्या हाकेला ओ देऊन मानवाला संकटातून बाहेर काढतो. असा विश्वास असतांनाही मानवी जीवनामध्ये अनेक बाबींना अनुसरुन दुरिताचे अस्तित्व दिसून येते. तेव्हा ईश्वराशिवाय आणखी कोणतीतरी शक्ती या निसर्गामध्ये असली पाहीजे. आशी सामान्य कल्पना सुद्धा आदिवासी समुदायामध्ये रुढ झाली असावी. कारण या समुदायामध्ये देव, आत्मा, अन्य अदृश्य शक्ती आणि प्रत्यक्ष निसर्ग इत्यादीला महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येत. एकंदर आदिवासी समुदायांमध्ये श्रद्धा असो वा भीती, युक्ती असो वा नीति या पैकी कोणत्याना कोणत्या कारनाने ईश्वराशिवाय इतरही काही घटकांना अनुसरुन प्रार्थणा, पूजा, धार्मिक विधी, संस्कार, समारंभ होत असतात. तेव्हा या ठिकाणी मुख्यत्वाने 'आदिवासींची ईश्वर संकल्पना' या विषयाला अनुसरुन चर्चा करित असतांना ईश्वराशिवाय देव, आत्मा, अन्य अदृश्य शक्ती आणि निसर्ग या विषयांवर चर्चा करने तितकेच आवश्यक वाटते. शिवाय या सर्व विषयांचा तत्त्वज्ञानात प्रचलीत असलेल्या लौकिक व अलौकिक विषयांशी काही संबंध आहे काय ? याकडे सुद्धा लक्ष वेधणे महत्वाचे वाटते.

भारतात व भारताच्या बाहेर एकंदर सबंध जगामध्ये आदिवासी समुदायाचे अस्तित्व आहे. भारतात वारली, ठाकूर, गोंड, कोलाम, कोरकू, आंध, भिल्ल, गोवारी, तोडा, हो, कोटा, भुजिया, कमार, कातकरी, संथाल, गारो, मिकीर, बेंगा, आगरिया, परधान, ओझा, मझवार, सवर, मारिया, धसिया, भरिया, देवार, धनुदार, खोड तर भारताबाहेर मॅलेनेशियन आदिवासी, इरोक्वोइस, अल्लोनाकियन, सियुक्स इत्यादी आदिवासी आढळून येतात. या पैकी काही आदिवासी समुदाय ईश्वराला, काही देवाला, काही कुठल्यातरी अदृश्य वा चैतन्यशक्तीला, काही आत्म्याला तर काही निसर्गाला मानतात. सामान्यतः ईश्वर, चैतन्यशक्ती (Spiritual), आत्मा या बाबी चैतनयुक्त संकल्पना (Idealism) आहेत. तर निसर्ग व देवता या भौतिक संकल्पना

(Materialism) आहेत. यावरुन आदिवासी समुदाय जड आणि चेतन या दोन्ही स्वरुपात दैवी शक्तीला महत्व देतो. असे म्हणता येईल.

पाश्चात्य दृष्टिकोणातून विचार केला असता, ईश्वर संकल्पना ही विवेकीपणातून निर्माण झालेली संकल्पना आहे. विवेकीपणा हा मानवाच्या बुद्धीचा गुण आहे. अर्थात मानवाच्या बुद्धीनेच ईश्वर कल्पना निर्माण केली आहे. बौद्धिक दृष्टया विश्वामध्ये जी सुसंगती वा एकसुत्रता दिसून येते त्यामागे कोणते तरी एक अलौकिक कारण असले पाहिजे. जे की, निर्गुण, निराकार, निरावयवी, अनादी, अनंत, स्वतंत्र, पूर्ण, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, अविकारी, अपरिवर्तनशील, अमूर्त, सत, चीत, आनंद, नित्य, निरपेक्ष असले पाहिजे. असे हे वैशिष्टये केवळ आणि केवळ ईश्वर या घटकामध्येच असतात. ईश्वर या सृष्टीचा निर्माता आहे. पण तो या सृष्टीत राहत नाही. ईश्वराचे आकलन बुद्धिला होते. पण तो या बुद्धीतही राहत नाही. ईश्वर हे एक असे शुभ तत्त्व आहे की, त्याकडे सर्वांनी आकर्षित झाले पाहिजे. पण तो ना भक्तीचा विषय आहे ना उपासनेचा. अशा या ईश्वराची एकमेव सत्ता आहे. तीच सर्वश्रेष्ठ आहे. पण आदिवासी समुदायाच्या दृष्टीकोणातून पाहिले असता, ईश्वर हा या सृष्टीचा निर्माता आहे. तो सृष्टीतच निरनिराळया रुपाने निवास करतो. तोच या सृष्टीतील सर्व चांगल्या वाईट घटना व घडामोडी मागे कारण आहे. परिणामी तो भक्तीचा आणि उपासनेचा विषय आहे. अशा प्रकारचा प्रत्यय येतो. निश्चितपणे आदिवासींची ईश्वर विषयीची धारणा ही पाश्चात्यांच्या विचारांच्या तूलनेत निराळी आहे.

भारतीय परंपरेत वेद व वैदिक संस्कृतीचे एक विशेष महत्व आहे. वेदांना अनुसरुन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ईश्वराचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तर्कतीर्थ सांगतात त्यावरुन, "सर्व प्रथम ऋग्वेदामध्ये 'धाता, विश्वकर्मा, भूतपति' इत्यादी नामांने ईश्वर व्यक्त झाला आहे. शिवाय अथर्ववेदातील चार ब्रह्मसूक्तामध्ये विश्वाच्या उत्पत्ति–स्थिति–लयाचे कारण म्हणून 'ब्रह्म, आत्मा' या संज्ञा वापरण्यात आल्या आहेत. त्यातूनही ईश्वराचा प्रत्यय येतो. पण ईश्वर संकल्पनेची तात्त्विक मांडणी पहिल्यांदा प्राचीन उपनिषदांमध्ये पहावयास मिळते. उपनिषदात ईश्वर, महेश्वर, ब्रह्म, परब्रह्म, सत, अक्षर, आत्मा, अंतर्यामी व परमात्मा या संज्ञा वापरुन ईश्वर संकल्पना व्यक्त झाली आहे. वेगवेगळया दृष्टिकोणातून विचार केला असता कार्याचे कारणरुप, म्हणजे अकार्य असे कारण म्हणजे ईश्वर होय. शाश्वत व नित्य अशा ज्ञानाचा ज्ञाता म्हणजे ईश्वर होय. पारलौकिक व मोक्षप्रद ज्ञान देणारा, जननमरणाधीन नसलेला आद्य गुरु म्हणजे ईश्वर होय (उदा.यहुदी, ख्रिस्त, इस्लाम धर्म प्रामणे)."[पप] वेदापासून ते उपनिषेदांपर्यंतच्या आणि इतर धर्माच्या ईश्वर संकल्पनेतून ईश्वर तत्त्व हे आत्मा, चेतनशक्ती, विशेष पुरुष आणि देवतांच्या रुपात असते असे म्हणता येते. याचाच प्रत्यय न्याय, वैशेषिक, योग, मीमांसा या दर्शनातून आणि विशेष म्हणजे आदिवासी समुदायातनूही येतो.

आदिवासी समुदाय सुद्धा ईश्वराला देवतांच्या रुपात ही पहातो. निर्गुण असलेल्या सगुण ईश्वराला देवता म्हणता येईल. देवता या काही तरी देणाऱ्या असतात. वास्तविक पहाता आदिवासींचे ते सगुण रुप मध्वाचार्य किंवा निम्बार्काचार्य सुचवितात त्या प्रमाणे विष्णू किंवा कृष्ण यांच्या सारखे व्यक्तीस्वरुप असायला पाहीजे होते. पण आदिवासींनी ईश्वराचे सगुण रुप हे ऋगवेदातील देवता रुप आहे. उदा. कोकरु हा आदिवासी समुदाय ईश्वराचे अस्तित्व मानतो पण तो त्या ईश्वराला 'नारायण' या नावाने जानतो. त्यांचा तो नारायण म्हणजे 'सुर्य' होय. या शिवाय ऑस्ट्रेलियातील अरुण्ट हा आदिवासी समुदाय देखिल ईश्वराचे प्रतिक व चिन्हांच्या माध्येमातून अस्तित्व स्वीकारतो. सामान्यतः वेद हे काही भौतिक आणि काही अभौतिक तत्त्वांना देवता मानतात. प्रामुख्याने वेदामध्ये वरुण, सुर्य, चंद्र, उषा, वायू, पर्जन्य, आपः, सोम, अग्नि, सरस्वती, पृथ्वी आदिंना देवता म्हणून संबोधले गेले आहे.[पपप] अशा या देवतांना प्रसन्न करण्यासाठी वा या देवतांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वेदामध्ये यज्ञाचे आणि यज्ञाच्या निमित्ताने बळीचे प्रयोजन केले गेले आहे. यज्ञ आणि बळी प्रथा आदिवासी समुदायामध्ये ही पहावयास मिळते. तसे पाहिले असता वेदांमध्ये निर्गुण अशा 'ईश्वराची' संकल्पना स्पष्टपणे पहावयास मिळत नाही. पण या सर्व विषयांच्या मागे कोणती तरी अदृश्य शक्ती असल्याची कल्पना तेथे झाली असल्याचे दिसून येते. जी की आदिवासींमध्ये सुद्धा आहे. यावरुन ईश्वर आणि त्याला अनुसरुन देवता संकल्पनेच्या संदर्भात आदिवासींना मुळच्या वैदिकांचे पाईक मानल्यास अतिशोक्ती होणार नाही.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात देकार्त सांगतो त्या प्रमाणे, आत्मा म्हणजे 'स्व' ची अशी सत्ता की जीचे अस्तित्व स्वतःलाही नाकारता येत नाही. चार्वाक सांगतात त्या प्रमाणे चैतन्य विशिष्ट देह असलेला 'मी' च्या माध्यमातून आत्मा स्वीकारावा लागतो. न्याय दर्शनात आत्म्याच्या रुपात ईश्वराचे अस्तित्व स्वीकारले आहे. तात्त्विक पातळीवर आत्मा हा ज्ञाता, कर्ता आणि ईश्वर ठरतो. न्यायांनी मनुष्याला अनुसरुन जीवात्मा आणि ईश्वराला अनुसरुन परमात्म्याची संकल्पना मांडली आहे.[पफ] आदिवासी

समुदायामध्ये सुद्धा जीवात्मा आणि मृतात्मा ही संकल्पना रुढ आहे. प्रामुख्याने 'हो, तोडा, कोटा' या आदिवासी समुदांमध्ये जीवात्मा आणि मृतात्मा ही संकल्पना पहावयास मिळते. हे समुदाय या दोन्ही प्रकारच्या आत्म्यांना प्रसन्न करण्यासाठी हरीत संस्कार आणि सुखा संस्काराचे आयोजन करित असतात. धर्माच्या उत्पत्तीला अनुसरुन एडवर्ड टायलर यांनी सर्वात्मवादाचा सिद्धांत मांडला आहे. या सिद्धांतानुसार आदिवासी समुदाय आत्म्याचे अस्तित्व सर्वत्र मान्य करतो. हा आत्मा पिशाच्च, भूत, देव, समंध, प्रेतात्मा इत्यादी अलौकिक प्राण्यांमध्ये वास करतो. या आत्म्याला प्रसन्न करण्यासाठी आदिवासी लोक देवपूजा, पितरपूजा, पिशाच्चपूजा याशिवाय पशुपूजा, वृक्षपूजा, जलदेवतापूजा, पक्षीपूजा करीत असतात.[अ]

अदृश्य शक्ति हा तत्त्वज्ञानातला एक विशेष विषय आहे. वेदामध्ये गोप्ता वा ऋताला नैतिक आणि भौतिक नियमांच्या मागे असलेल्या अदृश्य शक्तिच्या रुपात स्वीकारण्यात आले आहे. पण प्रामुख्याने या विषयावर वैशेषिकांनी भर दिल्याचे पहावयास मिळते. वैशेषिक परमाणु आणि आत्म्यांमध्ये असलेल्या गतीच्या कारणाच्या रुपात 'अदृष्ट' या चेतनशक्तिचा स्वीकार करतात. ही चेतनशक्ति मानवाच्या व्यक्तिगत आत्म्यामध्ये निवास करते. जीवाचे जन्म ठिकाण, वेळ आणि परिस्थिती इतकेच नव्हे तर माता–पीता हे सर्व या अदृष्ट म्हणजे चेतन शक्ति कडूनच निश्चित होत असते.[अप] अशा प्रकारची चेतनशक्ति आदिवासी समुदायामध्ये सुद्धा पहावयास मिळते. उत्तर पुर्व भारतातील गारो हा आदिवासी समुदाय आत्मा, पुनर्जन्म इत्यादीच्या रुपात अदृश्य आशा शक्तिचे अस्तित्व मानतो. आणि विशेष म्हणजे या शक्तिला प्रसन्न करण्यासाठी पशु–पक्षांचा बळी सुद्धा देतो. या शिवाय इंडोनेशियातले मॅलेनेशियन, उत्तर अमेरिकेतले इरोक्वोइस, अल्लोनाकियन, सिगुक्स हे सर्व आदिवासी समुदाय वेगवेगळया नावांनी चेतन शक्तिचा स्वीकार करतात. या पैकी मॅलेनेशियन आदिवासीनी चेतन शक्तिसाठी 'माना' ही संज्ञा वापरली आहे.

आदिवासी समुदायाची अशी धारणा आहे की, माना नावाची ही शक्ति समाजातील नेता, शामन, वैद्य, श्रेष्ठ गायक, वादक, कलाकार, उत्तम शिकारी इत्यादी लोकांच्या माध्यमातून व्यक्त होत असते. या समुदायांमध्ये अशा या शक्तिला प्रसन्न करण्यासाठी संस्कार व समारंभाचे आयोजन केले जाते. एकंदर आदिवासी समुदायामध्ये ईश्वराच्या वा विशुद्ध अशा आत्म्याच्या रुपात दैवी गुण असलेल्या पुरुषाची सुद्धा कल्पना रुढ आहे. भारतीय तत्त्वज्ञानात महर्षी पतंजली यांनी क्लेश, कर्म, विपाक, आणि आशय म्हणजेच सुखाविषयीची वासना इत्यादीशी संबंध नसणाऱ्या आणि इतर पुरुषांपेक्षा विशेष असलेल्या पुरुषाला ईश्वर मानले आहे.[अपप] साधारणः त्यांनी सदाचारी वा आर्दश पुरुषाला ईश्वर मानले आहे. आदिवासी समुदायामध्ये प्रार्थणा, धार्मिक विधी, निषेध नियम सुचविणाऱ्या आर्दश पुरुषाच्या रुपात शामन, भगत, भगतीन यांना महत्व प्राप्त झाले आहे.

आदिवासी समुदायामध्ये जादूटोणा हा एक महत्वाचा विषय आहे. स्टीफन फुक्स यांच्या मते, 'आदिवसी जीवनात जादू आणि धर्माचा समन्वय आढळून येतो.'[अपपप] या समुदायामध्ये दुष्काळ, महापूर, रोगराई, शत्रूचे आक्रमन इत्यादी संकटांना दूर करण्यासाठी जादुटोणा केला जातो. या शिवाय गावरक्षण, रोग निर्मुलन, कौल लावने (टॉस), शकून–अपशकून, चेटकिणी (भूताटकी), चुडेल सुटका यासाठी सुद्धा जादुटोणाला महत्व दिले जाते. कापड, अंगठी, विडा इत्यादी हे जादुटोण्याची साधने असतात. जादुटोणा करणारे लोक वेगवेळया समुदायांमध्ये शामन, भगत, भगतीन, पुजारो, दवार, गुणिया, जानपांडे, भुमिया, भरारा, झाकर, मांडीया इत्यादी पदांनी ओळखले जातात. हे सर्व लोक वेगवेगळया विषयांना अनुसरुन जादु करीत असतात. अलौकिक शक्तिवर नियंत्रण ठेवणे हाच या जादु करणाऱ्या लोकांचा उद्देश असतो. आदिवासी समुदायामध्ये वर उल्लेखित लोकांशिवाय जाणकार व्यक्तिसुद्धा जादुटोणा करित असतो[पप] आदिवासी समुदायातल्या या जादुटोण्याचा प्रत्यय आपल्याला प्रामुख्याने अथर्ववेदामध्ये पहावयास मिळतो. वास्तविक पहाता वेदांचा मुळ विषय जादुटोणा हा आहे की नाही ? हा एक स्वतंत्र प्रश्न आहे पण याठिकाणी आदिवासींच्या धार्मिक आचरणाकडे पाहुन ऐवढेच म्हणता येईल की, आदिवासी हे मुळचे पण अप्रगत वैदिक आहेत.

निष्कर्ष :– सामान्यतः धर्मांतर्गत ईश्वर, आत्मा, अदृश्य शक्ति, आर्दश पुरुष, निसर्ग शक्ति इत्यादीची कल्पना केली जाते. पण आदिवासींचे या सर्व संकल्पनांसंदर्भातले आचरण वा व्यवहार पाहीले असता असे म्हणता येईल की, ईश्वर व त्याला अनुसरुन असलेल्या इतर संकल्पनांमूळे धर्माची कल्पना रुढ झाली असावी. मानवी संस्कृतीच्या इतिहासात आदिवासी समुदाय हाच खऱ्या अर्थाने पहिला समुदाय असल्याचे मानून असे म्हणता येईल की, धर्म संकल्पनेच्या स्थापनेसाठी लागणारे उपादान कारण आदिवासींनीच पुरविले होते आणि यावरुनच आदिवासींच्या ईश्वरविषयक विचारांचे महत्व आबाधित रहाते. दुसरी बाब आशी की, आदिवासी समुदाय आणि वैदिक काळातील लोकांमध्ये असलेली धर्माचरण पद्धती यांच्यात साम्यता दिसून येते. म्हणून आदिवासींना मुळच्या वैदिकांचे वंशज म्हणण्यास हरकत नसावी.